नि (3)

दिनांक: 13/10/2025

# प्रदूषण व फटाकेविरहित पर्यावरणपूरक दिवाळीसाजरे करणेसाठी नागरिकांना आवाहन

पुणे मनपातर्फे शहरातील नागरिकांना दिवाळी हा सण पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. दिवाळी हा सण अंधार दूर करून प्रकाश निर्माण करणारा दीप मांगल्याचे प्रतिक मानला जातो. दिवाळी सण साजरा करताना हवा प्रदूषण तसेच ध्वनी प्रदूषण यांमुळे उद्भवणाऱ्या समस्यांना आळा घालण्याकरिता पर्यावरणपूरक पद्धतीने हा उत्सव साजरा करावा यासाठी नागरिकांना खालील प्रमाणे आवाहन करण्यात येत आहे.

हवा प्रदूषण :

- फटाके हे वायू प्रदूषणास कारणीभूत ठरतात, तरी शहरातील हवेचे प्रदूषण कमी करण्यासाठी प्रत्येक नागरिकांनी फटाक्यांचा वापर करणे टाळावे.
- दिवाळी काळात फटाके फोडल्यामुळे प्रदूषणाचे प्रमाण जास्त होऊन श्वसनसंस्थेवर दुष्परिणाम होतात, विशेषतः मुले, वृद्ध आणि श्वसनविकारग्रस्त व्यक्तींच्या आरोग्याला धोका निर्माण होतो तसेच श्वसनाचे आजार होवू शकतात यासाठी जास्त धूर उत्सर्जित करणाऱ्या फटाक्यांचा वापर करणे टाळावे.

ध्वनी प्रदूषण :

- ध्वनी प्रदूषण टाळण्यासाठी मोठ्या आवाजाचे फटाके यांचा वापर टाळावा.
- दिवाळीत १२५ डेसिबलपेक्षा जास्त आवाज करणारे फटाके उडविणास मनाई केली आहे, तरी यांसारखे फटाके उडविणे टाळावे.
- नागरिकांनी शांतता क्षेत्र जसे की शैक्षणिक संस्था, दवाखाने, न्यायालये इ. ठिकाणच्या परिसरात फटाके उडवू नये.

पर्यावरणपूरक पर्याय :

- नागरिकांनी घर सजविण्यासाठी अधिक ऊर्जा कार्यक्षम प्रकाश देणारे LED दिवे किंवा अपारंपारिक ऊर्जा स्रोत जसे की सौर दिवे वापरावेत.
- प्लास्टर ऑफ पॅरीस (Plaster of Paris) पासून बनवलेले किल्ले पर्यावरणास घातक ठरतात त्यांचा वापर न करता दगड मातीपासून किल्ले बनवावेत.
- रासायनिक रंग / रांगोळी न वापरता रांगोळीकरीता पर्यावरणपूरक साहित्यांचा वापर करावा.
- प्लास्टिकचे आकाशकंदील न वापरता पर्यावरणपूरक किंवा रिसायकल करता येणाऱ्या वस्तूंपासून बनलेले आकाशकंदील वापरुन इको फ्रेंडली सजावट करावी.
- सजावटीसाठी तसेच भेटवस्तू देताना एकेरी प्लास्टिकचा वापर टाळावा, टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू तयार कराव्यात.
- शाळा, महाविद्यालये व नागरिक संघटना यांनी "नो क्रॅकर दिवाळी" जनजागृती मोहीम राबवावी.
- दिवाळी पूर्वी व दिवाळी नंतर स्वच्छता मोहिमेमध्ये सहभागी व्हावे.

"स्वच्छ पुणे, निरोगी पुणे" याकरिता नागरिकांनी प्रदूषण मुक्त दिवाळी साजरी करावी.

(पृथ्वीराज बी. पी.)
अति. महापालिका आयुक्त (इ)
पुणे महानगरपालिका